नमुना क्र. एन् - २

**वैधानिक लेखापरिक्षणाचा अहवाल**

(कलम ८१ आणि नियम ६९(३) नुसार)

प्रति

मा. सभासद

स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित रत्नागिरी जिल्हा

रत्नागिरी

संदर्भ : दि. २०.०९.२०२१ रोजीचे संदर्भ क्र. ११७ प्रमाणे नेमणुकीचे पत्र

**वैधानिक लेखापरिक्षकांचा आर्थिक पत्रकांबाबत अहवाल**

१. आम्ही दि. ०१.०४.२०२१ ते ३१.०३.२०२२ या कालावधीकरीता **स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित रत्नागिरी जिल्हा** या संस्थेच्या सोबत जोडलेल्या आर्थिक पत्रकांचे लेखापरिक्षण केले असून सदर आर्थिक पत्रकांमध्ये दि. **३१.०३.२०२२** रोजीचा ताळेबंद, त्या दिनांकास संपणा-या वर्षाचे नफा तोटा पत्रक, महत्वाच्या हिशोब धोरणांचा सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश होतो.

**आर्थिक पत्रकांबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी**

२. महाराष्ट्र सहाकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये सदर आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय मंडळाची असून त्यामध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अंतर्गत नियंत्रण आराखडा व रचना तयार करणे, अंमलात आणणे व देखभाल करुन आर्थिक पत्रके तयार करणे की जेणेकरुन त्यामध्ये महत्वाची खोटी किंवा चुकीची माहिती / विधाने नसावित की जी त्रुटीने / चुकीने किंवा अफरातफरीने असोत.

**लेखापरिक्षकाची जबाबदारी**

३. आमच्या लेखापरिक्षणानुसार सदर आर्थिक पत्रकांबाबत अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया यांनी नेमून दिलेल्या आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० प्रमाणे लागू असणा-या प्रमाणकांप्रमाणे आम्ही लेखापरिक्षण केले आहे. सदर प्रमाणकांप्रमाणे आम्ही नितिमत्तेचे पालन करणे आणि आर्थिक पत्रके महत्वाच्या त्रुटी / चुकांपासून मुक्त आहेत याबाबत पुरेसे आश्वस्त होण्याकरीता लेखापरिक्षणाचे नियोजन आणि कार्य करावे लागते.

४. आर्थिक पत्रकांमध्ये नमूद केलल्या रक्कमा आणि माहिती याबाबत लेखापरिक्षण पुरावा गोळा करण्यासंबंधीच्या कार्याचा लेखापरिक्षणात समावेश होतो. फसवणूक अथवा चुकीमुळे होणा-या आर्थिक पत्रकांमधील दोषांबाबतच्या जोखमीचा अंदाजाप्रमाणे लेखापरिक्षण कार्यातील पद्धती निवडल्या जातात. सदर जोखमीचा अंदाज करताना, सद्य परिस्थितीत योग्य अशा लेखापरिक्षण कार्यपद्धती ठरविण्यासाठी संस्थेच्या आर्थिकपत्रके तयार आणि सादर करण्यासंबंधीच्या अंतर्गत नियंत्रणांचा विचार लेखापरिक्षकाकडून केला जातो. वापरलेल्या हिशोबातील धोरणांची योग्यता, व्यवस्थापनाने केलेले अंदाज आणि आर्थिक पत्रकांचे सर्वसाधारण सादरीकरण याबाबतच्या मूल्यांकनाचा देखील लेखापरिक्षणात समावेश होतो.

JAMBHEKAR & ASSOCIATES
KUDAL
M.No. 119832
CHARTERED ACCOUNTANTS

५. आमच्या लेखापरिक्षाणाच्या अभिप्रायाकरीता आम्ही मिळवलेला लेखापरिक्षणातील पुरावा पुरेसा आणि योग्य आहे असा आमचा विश्वास आहे.

**अभिप्राय**

६. आमच्या मते, आम्हाला मिळालेली माहिती आणि आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणांनुसार सदर हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१, इतर लागू असलेले अधिनियम, निबंधकांनी जारी केलेली परिपत्रके यांना अनुसरुन आणि भारतात स्विकारलेली हिशोबाची मूलतत्त्वे यानुसार खालीलप्रमाणे खरी व सत्य स्थिती दर्शवितात -

१. ताळेबंदाच्या बाबतीत दि. **३१.०३.२०२२** रोजीची संस्थेची आर्थिक परिस्थिती
२. नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपलेल्या वर्षाचा नफा

**अन्य कायदे आणि नियामक बाबींवरील अहवाल**

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधियमातील तरतुदींनुसार ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

८. आम्ही अहवाल देतो की

(अ) आमच्या माहिती आणि समजुतीप्रमाणे लेखापरिक्षणाकरीता आवश्यक असणारी माहिती आणि खुलासे आम्हाला मिळाले आहेत आणि ते आम्हास समाधानकारक आढळलेले आहेत.

(ब) आमच्या निदर्शनास आलेले संस्थेचे व्यवहार संस्थेच्या अधिकारात आहेत.

(क) संस्थेची कार्यालये आणि शाखांकडून मिळालेली माहिती लेखापरिक्षणाकरीता पुरेशी आढळलेली आहे.

९. आमच्या मतानुसार संस्थेचा ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक संस्थेला लागू असणा-या लेखांकन मानांकनानुसार आहेत.

१०. आम्ही आणखी अहवाल देतो की-

१) या अहवालासंदर्भातील ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक संस्थेची हिशोबपुस्तकांशी आणि माहितीपत्रकांबरोबर जुळणारे आहेत.

२) हिशोबाच्या पुस्तकांचे तपासणीनुसार संस्थेने अधिनियमानुसार आवश्यक असणारी हिशोब पुस्तके ठेवलेली आहेत.

३) आवश्यकतेनुसार शाखेच्या लेखापरिक्षकांनी दिलेले शाखांचे लेखापरिक्षण अहवाल आम्ही विचारात घेतलेले आहेत.

४) चालू लेखापरिक्षण वर्षाकरीता संस्थेला **"अ"** लेखापरिक्षण वर्ग देण्यात आला आहे.

स्थान : रत्नागिरी

दिनांक : ०२.०८.२०२२

UDIN : 22119832AOHCBR2419